# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/03/2023 (बुधवार) सकाळ

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत थुल ले आउट काटोल येथे दिनांक १४/०३/२०२३ चे १०.०० वा. ते ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. आशाबाई दिवाकर कोकाटे, वय ५६ वर्ष, रा. थुल ले आउट काटोल ही दि. १४/३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. आपल्या घराला कुलुप लावुन आपल्या पतिसह मेढला येथे डयुटीवर गेली असता नंतर फिर्यादीचे पति हे घरी परत आले असता त्यांना घराचा गेट उघडा दिसला कुलुप खाली पडलेले दिसले सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले. असे फिर्यादीचे पतिने पत्नीला फोन करून सांगितले. फिर्यादी घरी परत आली असता बेडरूम मधील कपाट उघडे व सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले. कपाटातील दागीने १) सोन्याचे मणी व पदक असलेले १५ ग्रॅमचे मंगळसुत्र किंमती अंदाजे ६०००० /— रू २) गळयातील सोन्याचे डोरले ४ गॅम किंमती अंदाजे १६००० /— रू. ३) कानातील टॉप्स ३ ग्रॅम किंमती अंदाजे १२०० /— रूपये ४) १० ग्रॅम सोन्याचा गोफ किंमती अंदाजे ४०,००० रूपये ५) १२ ग्रॅम सोन्याचा गोफ किंमती अंदाजे ४८००० /— रूपये ६) दोन चांदीचे शिक्के किंमती अंदाजे १००० /— रू. असा एकुण १,७७,००० /— रूपयाचा मुद्देमाल घराचे दरवाज्याचे कुलुप तोडुन कपाटातुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोलते पोस्टे काटोल मो. नं. ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर वार्ड क्र. १६ नरखेड येथे दिनांक १३/०३/२०२३ चे १३.०० वा. ते १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— जितेंद्र रामभाउ कळंबे, वय ४९ वर्षे, रा. वार्ड १६ नरखेड याची आई ही घराचे दाराला कुलूप लावुन शेजारी बसली असता अज्ञात आरोपीने घरी कोणीही नसल्याचे पाहुन दाराला लागुन असलेला ताला तोडुन आत प्रवेश करून फिर्यादीचे घरातील लोखंडी आलमारीचा ताला तोडुन आलमारीत ठेवलेले नगदी ५१५०० /— रूपये, २८ ग्रॅम ची सोन्याची पोत, दोन ग्रॅम आणि एक ग्रॅम बदामी सोन्याची अंगठी असा एकुण १,२०,००० /—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि गावडे पोस्टे नरखेड मो. नं. ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर